# कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,

हुपरी - यळगूड, ४१६ २०३, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र)
फोन (०२३०) २४५०४०२ ते ६, ई-मेल : kprjsssk@gmail.com वेबसाईट: www.kallappannaawadejawaharsssk.com

## -- ऊस पिक परिसंवाद --

कारखान्याच्या ऊस विकास योजनेअंतर्गत
**"बदलत्या हवामानामध्ये ऊस उत्पादन वाढीसाठी उपाय"**
या विषयावर ऊस पिक परिसंवाद आयोजित केला आहे.

**- कार्यक्रमाचे अध्यक्ष –**
**आदरणीय श्री. कल्लाप्पाण्णा आवाडे (दादा),**
संस्थापक चेअरमन

**- प्रमुख मार्गदर्शक -**
**मा. श्री. सुरेश माने-पाटील**
(निवृत्त शास्त्रज्ञ, वसंतदादा शुगर इन्स्टिटट्यूट, पुणे)

**- प्रमुख उपस्थिती -**

**मा.श्री. बाबासो चौगुले**
व्हाईस चेअरमन

**मा. डॉ. श्री. राहूल आवाडे,**
केन कमिटी चेअरमन

**मा. श्री. आदगोंडा पाटील**
संचालक

**मा. श्री. जिनगोंडा पाटील (रूपाज)**
संचालक

**मा. श्री. अभयकुमार काश्मिरे**
संचालक

**मा. श्री. गौतम इंगळे**
संचालक

तेंव्हा या कार्यक्रमास आपण अगत्यपूर्वक उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**- स्वागतोत्सुक -**

**भूषण कोले**
सि. ॲग्री ओव्हरसियर,
(इचलकरंजी विभाग)

**भास्कर पट्टणकुडे**
उपमुख्य शेती अधिकारी

**किरण कांबळे**
मुख्य शेती अधिकारी

**कार्यक्रमाची वेळ** : शुक्रवार दि. २८/०४/२०२३ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता.

**स्थळ** : जैन सांस्कृतिक भवन (मंगलधाम), **रूई.**









तरुण भारत ६ मे

# एकरी शंभर टन ऊस उत्पादन सहज शक्य

## वसंतदादा शुगर इन्स्टिटट्यूटचे निवृत्त शास्त्रज्ञ सुरेश माने : रूई येथे ऊस पीक परिसंवाद

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

शेतकऱ्यांनी सुरुवातीपासूनच ऊस पिकाचे योग्य नियोजन केल्यास एकरी शंभर टन ऊस उत्पादन घेणे सहज शक्य आहे, असे मत वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे येथील निवृत्त शास्त्रज्ञ सुरेश माने–पाटील यांनी व्यक्त केले. रुई येथील ऊस पीक परिसंवाद कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जवाहर कारखान्याचे संस्थापक कल्लाप्पाण्णा आवाडे होते.

सुरुवातीला सशक्त आणि उत्तम बियाणांची निवड करणे आवश्यक आहे. लागणीसाठी ९ ते१० महिन्यांचा ऊस बियाणे निवडावे. ऊस शेतीसाठी सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी शेणखत, हिरवळीची खते, पाचट नियोजन करणे,सरीतील अंतर वाढवून ऊसाची संख्या नियोजन करणे आदी गोष्टी महत्वाच्या असल्याचे सांगितले.



**रूई : ऊस पीक परिसंवाद कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सुरेश माने, व्यासपीठावर कल्लाप्पाण्णा आवाडे, राहुल आवाडे, मान्यवर.**

रासायनिक खतांची मात्रा देताना रासायनिक खते शेणखतात मिसळून त्याची भट्टी लावून खत टाकले तर त्याचा चांगला परिणाम दिसून येतो. लागण ऊसाची तोड झाल्यानंतर खोडवा पिकाचे बुडके तासने, तुटाळी सांधणे, पाचट एक आड सरीत भरणे, या गोष्टींकडे प्रामुख्याने लक्ष दिले पाहिजे. बदलत्या हवामानानुसार पाणी व्यवस्थापनानासाठी ठिबक सिंचनाचा वापर करणे जास्त फायद्याचे ठरते. को. ८६०३२ या वाणाचा ऊस उत्पादन वाढीसाठी जास्त उपयोगी ठरतो. तसेच अन्य उपाय योजनांच्या माध्यमातून शेतकरी सहजपणे एकरी शंभर टन उत्पादन घेणे शक्य आहे, असे मत व्यक्त करत सुरेश पाटील यांनी मार्गदर्शन केले.

केन कमिटीचे चेअरमन राहुल आवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक संचालक अभयकुमार काश्मीरे यांनी केले. कारखान्याचे व्हाईस चेअरमन बाबासो चौगुले, संचालक आदगोंडा पाटील, जिनगोंडा पाटील, जवाहर बँकेचे संचालक पद्मान्ना हेरवाडे, राजाराम साखरचे नूतन संचालक संजय मगदूम, रुईचे सरपंच शकीला कोंन्नूर, उपसरपंच अश्विनी पोवार, मुख्य शेती अधिकारी किरण कांबळे, भास्कर पट्टणकुडे, जवाहर कारखान्याचे सभासद, कर्मचारी, शेतकरी उपस्थित होते. आभार आदगोंडा पाटील यांनी मानले.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक
महासत्ता
कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

# एकरी शंभर टन ऊस उत्पादन सहज शक्य-माने

## रुई येथे ऊसपीक परिसंवाद संपन्न

पत्रकार- राकेश खाडे

..........................

शेतकऱ्यांनी सुरुवातीपासूनच ऊस पिकाचे योग्य नियोजन केल्यास एकरी शंभर टन ऊस उत्पादन घेणे सहज शक्य असल्याचे मत वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे येथील निवृत्त शास्त्रज्ञ सुरेश माने पाटील यांनी रुई (ता.हातकणंगले) येथील 'ऊस पीक परिसंवाद' कार्यक्रमात व्यक्त केले यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जवाहर कारखान्याचे संस्थापक कल्लाप्पाण्णा आवाडे होते.




ऊस पीक परिसंवाद कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सुरेश माने,व्यासपीठावर उपस्थित कल्लाप्पाण्णा आवाडे, राहुल आवाडे आदी मान्यवर

सुरुवातीला सशक्त आणि उत्तम बियाणांची निवड करणे आवश्यक आहे. लागणीसाठी ९ ते१० महिन्यांचा ऊस बियाणे निवडावे. ऊस शेतीसाठी सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी शेणखत, हिरवळीची खते, पाचट नियोजन करणे.सरीतील अंतर वाढवन ऊसाची संख्या नियोजन करणे आदी गोष्टी महत्वाच्या असल्याचे सांगितले.

बदलत्या हवामानानुसार पाणी व्यवस्थापनासाठी ठिबक सिंचनाचा वापर करणे जास्त फायद्याचे ठरते.को.८६०३२ हे वाण ऊस उत्पादन वाढीसाठी जास्त उपयोगी ठरतो. तसेच अन्य उपाय योजनांच्या माध्यमातन सहजपणे एकरी शंभर टन उत्पादन घेणे शक्य असल्याचे मत व्यक्त करत सुरेश पाटील यांनी चांगले मार्गदर्शन केले.

यावेळी केन कमिटीचे चेअरमन राहुल आवाडे उपस्थित होते.कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक संचालक अभयकुमार काश्मीरे यांनी केले. तसेच कारखान्याचे व्हा.चेअरमन बाबासो चौगुले,संचालक आदगोंडा पाटील,जिनगोंडा पाटील,जवाहर बँकेचे संचालक पद्मान्ना हेरवाडे, राजाराम साखरचे नूतन संचालक संजय मगदूम,रुईचे सरपंच शकीला कोन्नूर, उपसरपंच अश्विनी पोवार, मुख्य शेती अधिकारी किरण कांबळे, भास्कर पट्टणकुडे, आदींसह जवाहर कारखान्याचे सभासद, कर्मचारी वर्ग तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार आदगोंडा पाटील यांनी मानले.